<u>नवी मुंबई महानगरपालिका</u>

महापालिका सचिव कार्यालय,
नवीन मुख्यालय, 3 रा मजला,
बेलापूर, नवी मुंबई - 400 614.
दिनांक 30 डिसेंबर 2016.

<u>निवेदन पत्रिका</u>

नवी मुंबई महानगरपालिकेच्या सर्व सदस्यांना याद्वारे असे कळविण्यांत येते की, मा. महापौरांनी निश्चित केल्यानुसार, <u>महानगरपालिकेची जानेवारी 2017 ची सर्वसाधारण सभा बेलापूर, भूखंड क्रमांक 01, सेक्टर 15ए, नवी मुंबई महानगरपालिका, नवीन मुख्यालय येथील 5 व्या मजल्यावरील राजमाता जिजाऊ सभागृह</u> येथे भरेल.

2. महापालिका सदस्यांना अशी विनंती करण्यांत येते की, <u>जानेवारी</u> 2017 महिन्याच्या सर्वसाधारण सभेसाठी, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या कलम 44 अन्वये, आयुक्तांना काही प्रश्न विचारावयाचे असल्यास असे प्रश्न (जास्तीत जास्त 5 (पाच) ) आणि ठराव मांडावयाचे असल्यास ठरावाच्या सूचना (जास्तीत जास्त 3 (तीन) ) <u>महापालिका सचिव</u> यांचेकडे खालील नमुद करण्यात आलेल्या तारखेपर्यन्त सचिव कार्यालयाच्या आवक विभागात पोहोचतील अशा रितीने पाठविण्यांत यावेत :-

1. ठरावाच्या सूचना.
2. महाराष्ट्र म.अधि.कलम 44 अन्वये विचारावयाचे प्रश्न.

} शनिवार, दि. 07 जानेवारी 2017 पर्यंत.

मा. महापौरांच्या आदेशावरुन,

सही/-
(चित्रा बाविस्कर)
महापालिका सचिव,
नवी मुंबई महानगरपालिका.

---

<u>टिप</u> : सभेची तारीख, वार व वेळ मा. महापौर, सभागृहाच्या कामकाजाविषयक नियमावलीतील नियम 1(क) अन्वये निश्चित करतील त्याप्रमाणे सभेची कार्यक्रम पत्रिका सन्मा. सदस्यांना प्रसृत करण्यात येईल.

**नवी मुंबई महानगरपालिका**

महापालिका सचिव कार्यालय,
नवीन मुख्यालय, 3 रा मजला,
बेलापूर, नवी मुंबई - 400614.
दिनांक 25 जानेवारी 2017.

## निवेदन पत्रिका

**(शुध्दीपत्रक)**

नवी मुंबई महानगरपालिकेच्या सर्व सन्मा. सदस्यांना याद्वारे असे कळविण्यांत येते की, कोकण विभाग शिक्षक मतदार संघाच्या निवडणूक कार्यक्रमाच्या अनुषंगाने आचारसंहिता लागू झाली असल्याचे आपणास अवगत आहेच. तसेच शुक्रवार, दिनांक 27 जानेवारी 2017 रोजी सकाळी 11.00 वाजता बोलाविण्यात आलेल्या सभेच्या पटलावरील विषय क्रमांक 03 ते 142 बाबत मा.सर्वसाधारण सभेत चर्चा करून निर्णय घ्यावा किंवा कसे ही बाब मा.जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी, ठाणे यांचेकडे विचाराधीन आहे.

त्यामुळे उपरोक्त नमुद करण्यात आलेल्या सभेच्या पटलावरील विषय क्रमांक 03 ते 142 वगळण्यात येत असून त्याऐवजी विषय क्रमांक 01 व 02 (इतिवृत्त कायम करणे व प्रश्नोत्तरे) याबाबत विचार करण्यात येईल, याची कृपया नोंद घ्यावी.

मा. महापौरांच्या आदेशावरुन,

सही/-
(चित्रा बाविस्कर)
महापालिका सचिव,
नवी मुंबई महानगरपालिका.

...........................................................................................................

* कार्यक्रमपत्रिका व इ. कागदपत्रे यापुर्वीच प्रसृत करण्यांत आलेली आहेत.

** आचारसंहिता कालावधी संपल्यानंतर मा.महापौरांच्या आदेशानुसार विषय क्रमांक 03 ते 142 बाबत विचार करण्यात येईल.